# पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

कक्ष -९ (भरती कक्ष),
नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, डॉ दा.नौ.मार्ग, बृहन्मुंबई – ४००००१
दुरध्वनी क्र. ०२२ २२६२०१११, विस्तारीत क्र. ७०४ ई-मेल– desk9recruitcell.mum@mahapolice.gov.in

जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/८८९/२०२६, दि. १८ /०४ /२०२६.

## कारागृह पोलीस शिपाई भरती २०२४-२५

**विषय :-** कारागृह शिपाई, दक्षिण विभाग, मुंबई भरती २०२४-२५ अंतर्गत लेखी परीक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांनी नोंदविलेल्या आक्षेपाबाबत...

**संदर्भ :-** १) क्र.अपोमसं/प्रशि/कार्यपध्दती/पो.शि.भरती २०२४-२५/२२/२०२६, दि.१९/०१/२०२६
२) जा.क्र.पोआ/कक्ष-९/(पोभ)/९/(१)/८५०/२०२६, दि.१२/०४/२०२६.
३) जा.क्र.पोआ/कक्ष-९/(पोभ)/९/(१)/८६५/२०२६, दि.१३/०४/२०२६.

कारागृह शिपाई, दक्षिण विभाग, मुंबई भरती २०२४-२५ या पदाची लेखी परिक्षा दिनांक १२/०४/२०२६ रोजी मुंबईतील विविध परीक्षा केंद्र/शाळामध्ये घेण्यात आली होती. सदर लेखी परिक्षेची उत्तर तालिका प्रश्नसंचनिहाय (A, B, C, D) mumbaipolice.gov.in या संकेतस्थळावर त्याच दिवशी दिनांक १२/०४/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर उत्तर तालिकेबाबत उमेदवारांना त्यांचे आक्षेप https://apimbpr.iroams.com/mumbai-objections/ या लिंकवर (Link) दिनांक १४/०४/२०२६ रोजी सायंकाळी २०:०० वाजेपर्यंत नोंदविण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने, कारागृह शिपाई पदाच्या लेखी परीक्षेच्या प्रश्नांच्याबाबतीत प्राप्त आक्षेपांची पडताळणी केली असता, उमेदवारांनी नोंदविलेल्या आक्षेपामध्ये तथ्य आढळून आले नाहीत, त्यामुळे उमेदवारांचे आक्षेप दप्तरी दाखल करण्यात आले आहेत. लेखी परीक्षेचे गुण लवकरच mumbaipolice.gov.in या मुंबई पोलीस दलाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. सर्व संबंधीत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

( नितीन पवार )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-२) तथा
सचिव, मुंबई पोलीस शिपाई भरती २०२४-२५
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय.